# पीएनजीच्या दुकानांमध्ये मंगळसूत्र महोत्सव

**पुणे, ता. २ :** गुढीपाडव्याच्या निमित्ताने पीएनजीच्या सर्व दुकानांमध्ये मंगळसूत्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सहा मेपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते शुक्रवारी त्याचे उद्घाटन करण्यात आले.

या महोत्सवात मंगळसूत्रांचे पाचशेहून अधिक प्रकार उपलब्ध आहेत. चार ग्रॅम ते २०० ग्रॅम पर्यंतची मंगळसूत्रे उपलब्ध आहेत. मंगळसुत्राच्या मजुरीवर १० ते ३० टक्के सवलत असणार आहे. या निमित्ताने १५ ते ३० एप्रिल या काळात मंगळसूत्र छायाचित्र स्पर्धाही आयोजित केली आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी महिला ग्राहकांना मंगळसूत्र परिधान केलेल्या तीन वेगवेगळ्या वेशांमधील छायाचित्रे आपल्या नजीकच्या पीएनजीच्या दुकानात पाठवायची आहेत. परीक्षक समिती या छायाचित्रांची पाहणी करून विजेत्यांची निवड करतील.